RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ८, अंक २६(२)] गुरुवार, सप्टेंबर ८, २०२२/भाद्रपद १७, शके १९४४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

## असाधारण क्रमांक ५३

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४.—** महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम आणि महाराष्ट्र विधानमंडळातील विरोधी पक्ष नेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. | १—३ |

दिनांक ८ सप्टेंबर २०२२ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**सतिश वाघोले,**
प्रभारी सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

## सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक ८ सप्टेंबर २०२२ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम)

**महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम आणि महाराष्ट्र विधानमंडळातील विरोधी पक्ष नेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम आणि महाराष्ट्र विधानमंडळातील विरोधी पक्ष नेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या त्र्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :— १९५६ चा ४७. १९५६ चा ४८. १९५६ चा ४९. १९७८ चा महा. ८.

प्रकरण-एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते आणि महाराष्ट्र विधानमंडळातील विरोधी पक्ष नेत्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) अधिनियम, २०२२, असे म्हणावे.

(२) तो, १ एप्रिल २०२२ पासून अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

प्रकरण-दोन

## महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम याची सुधारणा.

सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम १२ब ची सुधारणा. **२.** महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियमाच्या कलम १२ब मध्ये, पोट-कलम (१) मधील, " राज्य शासनाकडून दरमहा रुपये २५,००० एवढे " या मजकुराऐवजी, " राज्य शासनाने, वेळोवेळी काढलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे दरमहा " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९५६ चा ४७.

प्रकरण-तीन

## महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम याची सुधारणा.

सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम १०क ची सुधारणा. **३.** महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियमाच्या कलम १०क मध्ये, पोट-कलम (१) मधील, " राज्य शासनाकडून दरमहा रुपये २५,००० एवढे " या मजकुराऐवजी, " राज्य शासनाने, वेळोवेळी काढलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे दरमहा " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९५६ चा ४८.

प्रकरण-चार

## महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम याची सुधारणा.

सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४९ याच्या कलम ६ ची सुधारणा. **४.** महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियमाच्या कलम ६ मध्ये, पोट-कलम (३) मधील, " राज्य शासनाकडून दरमहा रुपये २५,००० एवढे " या मजकुराऐवजी, " राज्य शासनाने, वेळोवेळी काढलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे दरमहा " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९५६ चा ४९.

प्रकरण-पाच

## महाराष्ट्र विधानमंडळातील विरोधी पक्ष नेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ याची सुधारणा.

१९७८ चा महा. ८.

५. महाराष्ट्र विधानमंडळातील विरोधी पक्ष नेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ याच्या कलम १०अ मध्ये, पोट-कलम (१) मधील, " राज्य शासनाकडून दरमहा रुपये २५,००० एवढे " या मजकुराऐवजी, " राज्य शासनाने, वेळोवेळी काढलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे दरमहा " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम १०अ ची सुधारणा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.